सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रूग्णालयांमध्ये पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः मवैअ-२०१७/प्र.क्र.५५२/सेवा-३
१० वा मजला, संकुल इमारत,
गो.ते.रूग्णालय आवार, मुंबई-४०० ००१
दिनांक: ११ एप्रिल,२०१८

वाचा

1) **शासन निर्णय क्रमांकः मवैअ२०१५/प्र.क्र.८५/सेवा-३, दिनांक-१७/०७/२०१५**
2) **शासन निर्णय क्रमांकः मवैअ २०१५/प्र.क्र.८५/सेवा-३ दि.३०/०९/२०१५**

प्रस्तावना:

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत रूग्णालयांमध्ये विशेषज्ञांची रिक्त असलेली पदे लक्षात घेऊन सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रूग्णांलयामध्ये कॉलेज ऑफ फिजीशियन आणि सर्जन (सीपीएस) संस्थेमार्फत चालविण्यात येणारे ८ पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम संदर्भाधिन क्र.१ येथील शासन निर्णयान्वये, तसेच ट्रॉपिकल मेडिसीन व हेल्थ अभ्यासक्रम संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णयान्वये, असे एकुण ९ पदव्युत्तर पदवीका अभ्यासक्रम सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षापासुन सुरु करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमामध्ये "डिप्लोमा इन मेडीकल रेडीओलॉजी ॲण्ड ईलेक्ट्रोलॉजी (DMRE) हा पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत रूग्णालयांमध्ये कॉलेज ऑफ फिजीशियन आणि सर्जन (CPS) या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमामध्ये "१०) डिप्लोमा इन मेडीकल रेडीओलॉजी ॲण्ड ईलेक्ट्रोलॉजी (DMRE)" या पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाचा समावेश सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासुन करण्यास याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

२. संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक १७.०७.२०१५ च्या शासन निर्णयामध्ये विहीत केलेले निकष सदर अभ्यासक्रम सुरु करण्यासाठीही लागू राहतील.

३.   सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१११६४०२९२३१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Varsha Munjaji Bharose

Digitally signed by Varsha Munjaji Bharose
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2f3096a175796cc670522c4aff97da20b708981b5122e87c8346c4cc7468f821, serialNumber=1bd844032884bbf2167bc99cd85325223aceef69d02bd455b7ca6972491623e0, cn=Varsha Munjaji Bharose
Date: 2018.04.11 18:24:04 +05'30'

व.मुं.भरोसे
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई.
२. संचालक, आरोग्य सेवा,मुंबई
३. उपसंचालक आरोग्य सेवा (सर्व)
४. सर्व जिल्हा शल्यचिकित्सक
५. सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी